महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-१० अंक-६ ऑक्टोबर - नोव्हेंबर २०१६

**प्रिय कर्मचारी बंधु आणि भगीनींनो,**

महापारेषण कंपनी देशातील अग्रेसर पारेषण कंपनी म्हणून ओळखली जाते. आपल्या सर्वांच्या सततच्या प्रयत्नाने व योगदानामुळे आज आपण ह्या स्तराला आलेलो आहेत. मात्र आपणास आज अनेक बदलांना सामोरे जावे लागत आहे. आर्थिक परिणामे चांगली राखण्यास आपण यशस्वी ठरलो, मात्र पुढे सुध्दा अशीच सुस्थिती राखण्यास आपल्याला यश आले पाहिजे.

त्याकरिता आपल्या सर्वांचे योगदान कारणीभुत ठरते. कारण कंपनी कुणा एका व्यक्तीवर किंवा चमुवर चालत नसते. तर प्रत्येक व्यक्तीचे योगदान त्याची दिशा व दशा ठरवत असत.

तसे पाहता योगदानास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे ते आपल्या सर्वांना ज्ञात आहे. आजपाहता आपला सर्व कर्मचारी/अधिकारी वर्ग कुशल आहे. मात्र आपआपल्या कार्यक्षेत्रात निपुणता (Excellence) आणण्याकरीता खुप वाव आहे. 'Excellence / Perfection is a journey and not a destination".

काम करीत असतांना आपल्या मनात असंख्य प्रश्न आले पाहिजेत. त्यावर समाधान प्राप्त करुन घेण्याचे जाणीवपुर्वक प्रयत्न आपल्याकडुन होणे अपेक्षित असते. प्रत्येक कामातील Critical Path आपल्याला Identify करता येणे आवश्यक आहे व तो उपलब्ध असलेल्या Resources मधून कसा Handle करायचा, हे आव्हानात्मक असते व त्यामध्येच आपल्या प्रयत्नांची व कुशलतेची कसोटी लागते.

कामाची माहिती करुन घेणे, त्याकरीता असलेल्या Resources चा अभ्यास करुन आढावा घेणे, कामाचे नियोजन तयार करणे, कृती आराखडा तयार करणे, Contingency Planning, Critical Path, Check List तयार करणे, Follow-up Plan तयार करणे अशा अनेक बाबी कामाशी घेतलेल्या काळजीचे द्योतक ठरतात. अश्या प्रकारच्या कार्यपध्दतीचे उत्कृष्ट योगदान कंपनीस त्यांच्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडुन मिळण्यास मदत होते.

अनेक वेळा आपण असे पाहतो की आपले अभियंते/अधिकारी/कर्मचारी त्यांच्या कामामध्ये निपुण असतात. मात्र त्यांना त्यांच्या कार्याबद्दल विचारले असता त्यांना सांगण्यास व मांडण्यास अडचणी येतात. Competency ह्या निकषामध्ये फक्त तांत्रिकी ज्ञान आवश्यक नसून त्या व्यक्ती मध्ये गुणात्मक वाढ असणे सुद्धा अपेक्षित असते.

त्यांचे प्रकटीकरण, विश्लेषण, विवेचन, MIS, विषय मांडण्याची पध्दत, प्रश्न/उत्तरे हाताळण्याची सचोटी तसेच Conflict Management, Problem Solving Ability, Team Work, Inter-Personal Skill, Communication Ability, Analytical Skill त्याच्याकडील असलेल्या ज्ञानाची उपयुक्तता ठरवत असते. ज्ञानाच्या उपयुक्ततेवर त्या व्यक्तीचा कंपनीच्या प्रगतीत त्याचा असलेला हातभार ठरवत असतो. जितका अधिक हातभार/योगदान तितका चांगला प्रतिसाद कंपनीस व त्या व्यक्तीस यशाच्या माध्यमातून मिळत असतो. "Sum Total of Individual Performance is Organisation Performance."

त्याकरिता फक्त Technical Knowledge वर विसंबून न राहता आपल्यामधील Leadership Qualities कशी वृद्धींगत होतील त्यावर लक्ष देणे गरजेचे आहे. तसे नाही केल्यास उत्कृष्ट Technical Knowledge असलेले अभियंते/अधिकारी कार्यक्षमतेमध्ये मागे पडले जातात.



**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

आपली Leadership Qualities वाढविण्याकरिता अथक परिश्रम घेण्याची गरज नसते. ही एक सामान्य प्रक्रिया असते. विषयांचा व्यवस्थित अभ्यास करणे, मांडणी करणे, सुटसुटीतपणे मुद्देनिहाय प्रकटीकरण, अचुक संकलीकरण, MIS, Analysis आणि अतिशय सोप्या पध्दतीमध्ये किचकट विषयाची माहिती देणे ह्या सर्व बाबी आपल्या Common Sense च्या जोरावर आपण आत्मसात करू शकतो. मात्र त्याकरिता निश्चय करून प्रयत्न करणे गरजेचे असते.

मला विश्वास आहे की, आपण सर्व आपल्यामधील क्रियाशक्ती अधिकाधिक वाढवून आपल्या कार्यकुशलतेचा उत्कर्ष बिंदू गाठण्यास प्रयत्नशील राहाल.

**नववर्षाच्या शुभेच्छा सह !**

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## वेतगनट १ व २ मधील अभियंत्यांचे चार दिवसीय प्रशिक्षण शिबीर





Alstom T&D India Ltd चेन्नई, Siemens ठाणे व औरंगाबाद, ESCI हैदराबाद, ABB India Limited वडोदरा येथे वेतगनट १ व २ मधील अभियंत्यांचे चार दिवसीय प्रशिक्षण शिबीर.

भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने जाहीर केलेल्या राष्ट्रीय प्रशिक्षण धोरणानुसार, महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रतिवर्षी किमान ७ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येते. या अनुषंगाने, वेतनगट १ व २ मधील १२६० अभियंत्योंना एकुण ६१ बॅचेसमध्ये सन २०१६-२०१७ करिता Functional Excellence या विषयावर ४ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. यापैकी Alstom चेन्नई येथे ४५० अभियंते, ABB-वडोदरा येथे १२० अभियंते, Siemens-ठाणे व औरंगाबाद येथे १८० अभियंते, ESCI हैदराबाद येथे ४५० अभियंते प्रशिक्षणासाठी पाठविण्याचे प्रयोजन आहे.

या बॅचेस २० ऑगस्ट २०१६ पासुन सुरु होऊन फेब्रुवारी २०१७ पर्यंत पूर्ण करण्यात येतील.

या विविध प्रशिक्षण केंद्रांना महापारेषणचे संचालक (प्रल्कप), श्री. रविद्रं चव्हाण, कार्यकारी संचालक (मा.सं.) श्री. सुरज वाघमारे, महाव्यवस्थापक (मा.सं. - तां.) श्री. सुधीर वानखेडे व अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण), श्री. शशीकांत बाकरे यांनी वेळोवेळी भेट देऊन आढावा घेतला.

या प्रशिक्षणानंतर अधिकाऱ्यांचे प्रतिसाद उपलब्ध झाले असुन, दैनंदिन कार्यालयीन अडथळे पार करण्यासाठी या प्रशिक्षणांमधून झालेल्या कौशल्य विकासाचा चांगला उपयोग होत असल्याचे अधिकाऱ्यांनी आवर्जुन सांगितले.

## Good Thoughts वॉट्स ॲप ग्रुप डोंबिवली

डोंबिवली विभागातील सर्वच उपकेंद्रात एक नवीन उपक्रम राबवण्यात येत आहे. एखादया कर्मचाऱ्याने, उपकेंद्राने एखादा अनोखा उपक्रम केला तर त्याचे अनुकरण इतर जण करत असतात.

पॉवर ट्रान्सफार्मर, ब्रेकर्स, CT, PT. इ. उपकरणांना ते गंजू नये म्हणून पाच-सहा वर्षात एकदा रंगवणे गरजेचे असते. उदा. ५० MVA T/L रंगवायला अंदाजे दोन लाख रु. इतका खर्च येतो. पण वाशाळ येथील कर्मचाऱ्यानी जुन्या कॉम्प्रेसरचा उपयोग करून, इंम्प्रेसमधून पेंट विकत घेवून अतिरिक्त भत्ता न घेता T/L रु. ५००० रुपयात रंगवला व अशाच प्रकारे इतर उपकरणंही रंगवलीत. या चांगल्या गोष्टीची माहिती मोबाईलवरुन वॉट्स ॲपवर इतर अनेकांनी पाहिली, वाचली. डोंबिवलीतील इतर उपकेंद्रानीही याचेच अनुकरण केले.

सोलर डिस्टील्ड वॉटर प्लॅंट १०० के.व्ही. उपकेंद्र, नेरुळ यांनी सुर्य प्रकाशावर डिस्टील्ड वॉटर प्लॅंट तयार केले. इतरांनीही त्यांचेप्रमाणे अनुकरण केले व विजेचा वापर व बिल रक्कम कमी केली.

जुन्या, Scrap मटेरियल पासून रॅक, माल वाहतूक करायची हातगाडी इ. तयार करणे. उपकेंद्रालगत बाग तयार करणे व त्याची देखभाल करण्यात सर्वाचाच सहभाग असतो. उपकेंद्राच्या सभोवती असणाऱ्या वॉल कम्पाऊंडचा उपयोग करून त्यावर भित्तीचित्रे काढणे व भिंती सुशोभित करणे. Safety, Saving of Energy, Saving Of Power अशा विषयावर स्लोगन लिहणे. वगैरे बाबी आपण करू शकतो.

अशा सर्व चांगल्या उपक्रमामुळे विभागात एकीची भावना तयार होते व सांघिक कार्यास बळ मिळते. ही भावना कर्मचाऱ्यांच्या मनात वाढीस लागली आहे.

**संकलन**
**श्रीकांत पेटकर**
कार्यकारी अभियंता
राज्य पारेषण उपक्रम, सांघिक कार्यालय, मुंबई

## प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, बाभळेश्वर येथे कार्यकारी संचालक (मा.सं.) यांची भेट




दि.२७.१०.२०१६ रोजी श्री. सुरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मा. सं.) यांनी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, बाभळेश्वर येथे भेट दिली . सदर भेटीत त्यांनी प्रशिक्षण केंद्राच्या कामकाजाचा आढावा घेतला. प्रशिक्षण समन्वयक श्री. भरत गवळी यांनी प्रशिक्षण केंद्राच्या कार्यावर सादरीकरण केले. सदर भेटीत त्यांनी प्रशिक्षण केंद्रात जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण कसे देता येईल यासाठी प्रयत्न करण्याच्या सुचना दिल्यात. श्री. वाघमारे यांनी ४०० केव्ही ग्रहण केंद्र व अउदा (सं व सु) विभाग बाभळेश्वर येथे ही भेट दिली. यावेळी सांघिक कार्यालयाचे श्री. शशिकांत बाकरे , अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) व श्री. महेश पाठक, कार्यकारी अभियंता, ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग, बाभळेश्वर हे उपस्थित होते.

## मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.) यांची औरंगाबाद परिमंडलास भेट



दि. २८ सप्टेंबर २०१६ रोजी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.), श्री सुगत गमरे, यांनी औरंगाबाद परिमंडलास भेट दिली. त्यावेळी औरंगाबाद परिमंडलाचे सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. हिरामण राठोड यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

तसेच श्री. प्रमोद गोडसे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) यांचे श्रीमती मंजुषा दुसाने, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले, याप्रसंगी औरंगाबाद परिमंडलाचे कार्यकारी अभियंता, श्री. विवेक कानडे व मानव संसाधन विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) यांनी औरंगाबाद परिमंडलांतर्गत मानव संसाधन विभागातील कामकाजा विषयी आढावा घेतला. तसेच कर्मचाऱ्यांचे मंडळ / परिमंडल स्तरावरील प्रश्न, देयके यांचा आढावा घेऊन सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत सुचना दिल्या.

पारेषण कंपनीचे ध्येय व उद्दिष्टे साध्य करण्याकरिता सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अधिक जोमाने काम करण्याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी अभिवादन

०६ डिसेंबर २०१६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी सांघिक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

ह्या अभिवादनाचे सुत्रसंचलन श्री. महेंद्र वाळके, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (पारेषण) यांनी केले. त्यामधून त्यांनी महामानवाच्या विशाल कार्याबद्दल सर्वांना माहिती करुन दिली. तसेच इतर वरिष्ठ अधिकारी यांनी सुध्दा महामानवाचा आदर्श पुढे आपल्या कृतीतुन कसा सुरु ठेवला पाहिजे ह्याबाबत मार्गदर्शन केले.

अखेरीस संचालक (वित्त) व संचालक (संचलन) यांच्या अभिवादनपर मार्गदर्शनाने सांगता झाली.

महापरिनिर्वाण दिनी महाराष्ट्रातील विविध कार्यालयांत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अधिकारी/कर्मचारी यांच्यातर्फे अभिवादन करण्यात आले.

## श्री. पवनकुमार तुळशीदास बढे ह्यांची संयुक्त राष्ट्राच्या डिसआरमामेंट फेलोशिपसाठी निवड

श्री. पवनकुमार तुळशीदास बढे ह्यांची संयुक्त राष्ट्राच्या डिसआरमामेंट फेलोशिप २०१६ साठी निवड झालेली आहे. ही फेलोशिप दरवर्षी जगभरातून २५ देशांच्या राजनैतिक अधिकारी यांना दिली जाते. ह्या फेलोशिप अंतर्गत हे २५ राजनैतिक अधिकारी १० आठवड्यांसाठी डिसआरमामेंट नॉन प्रोलिफेरेशन आणि इंटरनॅशनल सिक्युरिटी या विषयामध्ये प्रशिक्षीत केले जातात. ह्या फेलोशिप दरम्यान दहा आठवड्यामध्ये कॉन्फरन्स इन डिसआरमामेंट संयुक्त राष्ट्र, जिनेवा; ऑरगनॉयझेशन ऑफ प्रोहीबेशन ऑफ केमिकल वेपन्स, द हेग; इंटरनॅशनल कोर्ट ऑफ जस्टीस, द हेग; इंटरनॅशनल ॲटोमिक एनर्जी एजन्सी, व्हियन्ना; कॉम्प्रेहेन्सिव न्युक्लिअर टेस्ट बॅन ट्रिटी आरगनॉयझेशन व्हियन्ना; प्रथम कमिटी संयुक्त राष्ट्र, न्युयार्क ह्या इंटरनॅशनल संस्थाना भेट दिली जाते. ह्या शिवाय विविध देशांच्या निमंत्रणांवर हे राजनैतिक अधिकारी काही देशांचे स्टडी टूर करतात. ह्या वर्षी बर्न- स्विझर्लंड, बर्लिन-जर्मनी, बिजींग - चायना, सेउल-साउथ कोरीया, टोकिया, हिरोशिमा, नागासाकी-जपान येथे स्टडी व्हिजिट होणार आहेत.



श्री. पवनकुमार तुळशीदास बढे हे भारतीय विदेश सेवेतील २०१० बॅच चे अधिकारी असून ते भारतीय दुतावास व्हियन्ना-ऑस्ट्रिया येथे द्वितीय सचिव म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या पत्नी सौ.किर्ती बढे ह्या टेक्निकल युनिव्हर्सिटी व्हियन्ना येथे PhD करीत आहेत. मुलगा चि. अरुज बढे हा व्हियन्ना येथे त्यांच्या सोबत असतो. श्री.पवनकुमार तुळशीदास बढे हे मुळचे जळगाव चे असून ते श्री. तुळशीदास केशव बढे, निवृत्त उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य), म.रा.वि.मंडळ यांचे चिरंजीव आहेत.




## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे ऑक्टोबर / नोव्हेंबर-२०१६

**नियुक्ती-**

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | शशांक जेवळीकर | मुख्य अभियंता (पारेषण) | चाचणी, स्वयंचलन व दूरसंचार, सांघिक कार्यालय, मुंबई | १८.१०.२०१६ |
| २. | श्रीराम नानाजी भोपळे | मुख्य अभियंता (पारेषण) | राज्य पारेषण उपक्रम, सांघिक कार्यालय, मुंबई | १८.१०.२०१६ |
| ३. | सुनिल दत्त शर्मा | महाव्यवस्थापक (विवले) | वित्त व लेखा विभाग, सांघिक कार्यालय, मुंबई | १६.११.२०१६ |
| ४. | श्रीमती चारुता बेंद्रे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | प्रकल्प योजना, सांघिक कार्यालय, मुंबई | १६.११.२०१६ |
| ५. | सुभाष एम. देसाई | अधीक्षक अभियंता (पारेषण) | चाचणी, स्वयंचलन व दूरसंचार, सांघिक कार्यालय, मुंबई | १६.११.२०१६ |

**निवृत्ती-**

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | राजेंद्र महादेव तिजारे | अधीक्षक अभियंता(पारेषण) | चाचणी व दूरसंचार मंडल, अकोला | ३१.१०.२०१६ |
| २. | मोहन सिंग जयसिंग पटेल | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडल, कराड | ३१.१०.२०१६ |
| ३. | सुभाष गोपाळराव केळकर | मुख्य अभियंता (पारेषण) (स्वेच्छानिवृत्ती) | प्रकल्प योजना, सांघिक कार्यालय, मुंबई | ३०.११.२०१६ |

## अ.उ.दा प्रकल्प नि सं व सु परिमंडल नाशिकच्या अंतर मंडलीय नाट्यस्पर्धेत "आधारशिला" प्रथम



महापारेषणच्या अ.उ.दा.प्रकल्प नि सं व सु परिमंडल, नाशिक अंतर्गत आंतरमंडलीय नाट्यस्पर्धा २०१६-१७ दि. २९ व ३० नोव्हेंबर २०१६ रोजी कालिदास कलामंदिर, नाशिक येथे पार पडल्या. या स्पर्धेत, अ.उ.दा. सं व सु मंडल नाशिकतर्फे "रातमतरा" (लेखक - भगवान हिरे), अ.उ.दा. सं व सु मंडल भुसावळतर्फे "फलाट क्र. २" (लेखक - राजेश पवार), अ.उ.दा. प्रकल्प मंडल, नाशिक व अ.उ.दा. स्थापत्य मंडल, नाशिकतर्फे "भिंत काचेची" (लेखिका - रेखा बैजल) तसेच चाचणी व दूरसंचारण मंडल, नाशिक व अ.उ.दा. प्रकल्प नि संवसु परिमंडल, नाशिक तर्फे "आधारशिला" (लेखक - मुकुंद कुलकर्णी) अशी एकूण चार नाटके सादर करण्यात आली.

सदर नाट्यस्पर्धेत, चाचणी व दूरसंचारण मंडल, नाशिक व अ.उ.दा. प्रकल्प नि सं व सु परिमंडल, नाशिक तर्फे सादर करण्यात आलेल्या "आधारशिला" (लेखक - मुकुंद कुलकर्णी) या नाटकास सर्वोत्कृष्ट नाटक प्रथम क्रमांक तर अ.उ.दा. प्रकल्प मंडळ, नाशिक व अ.उ.दा. स्थापत्य मंडळ, नाशिकतर्फे सादर करण्यात आलेल्या "भिंत काचेची" (लेखिका - रेखा बैजल) या नाटकास द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

सदर स्पर्धेचे उद्घाटन श्री. दीपक कुमठेकर, मुख्य अभियंता, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या, नाशिक तर समारोप समारंभ श्री. पंकज सपाटे, मुख्य अभियंता, म.रा.वि.निर्मिती कंपनी मर्या. नाशिक यांचे हस्ते तसेच श्री.



भाऊराव राउत, मुख्य अभियंता, म.रा.वि.पारेषण कंपनी मर्या. नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. सदर स्पर्धा श्री. सतिश गायकवाड यांच्या कार्याध्यक्षतेखाली यशस्वीपणे पार पडल्या.

## अउदा संवसु विभाग, यतवतमाळ येथे संविधान दिन साजरा





अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, अमरावती अंतर्गत नव्याने मंजूर झालेल्या अउदा संवसु विभाग, यवतमाळ येथे दिनांक 26.11.2016 रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. सदर दिवशी अउदा संवसु मंडळ, अमरावती स्तरावरील सर्व उपकेंद्र प्रमुखांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या करीता अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, अमरावती चे मुख्य अभियंता, श्री सुरेशकुमार पाटील हे सुध्दा उपस्थित होते. श्री. प्रफुल्ल औघड, अधीक्षक अभियंता , श्री. नितीन अंगाईतकर, कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, यवतमाळ तसेच श्री. सुनिल पुरकर, कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, अमरावती यांचे प्रमुख उपस्थितीत बैठकीसाठी उपस्थित असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सामुहिकरित्या भारताचे संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून शपथ घेण्यात आली.

## अति उच्च दाब प्रकल्प नि. संवसु परिमंडल, नागपूर च्या आंतर प्रविभागीय नाट्यस्पर्धा संपन्न

गट वर्षे २०१६-१७ च्या अउदा प्रकल्प नि. संवसू परिमंडळ, नागपूर येथील आंतर प्रविभागीय नाट्यस्पर्धा दिनांक २४ व २५ नोव्हेंबर २०१६ रोजी, वन प्रशिक्षण प्रबोधिनी, (रेंजर कॉलेज) इंदिरा नगर, मुल रोड, चंद्रपूर येथे संपन्न झाल्या. ही नाट्यस्पर्धा अउदा संवसू प्रविभाग, चंद्रपूर व एचव्हीडीसी ग्र.के.संवसु प्रविभाग, चंद्रपूर यांच्या यजमान पदाखाली आयोजीत करण्यात आली. या नाट्यस्पर्धेचे उद्घाटन श्री. अशोक खडसे, संचालक, वन प्रशिक्षिण प्रबोधिनी, चंद्रपूर यांच्या हस्ते झाले. श्री. मिलींद बहादुरे, मुख्य अभियंता हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.प्रेक्षकांच्या प्रचंड प्रतिसादात तीन नाटके सादर करण्यात आली.

सदर स्पर्धेत अउदा संवसू प्रविभाग, चंद्रपूर व एचव्हीडीसी ग्र.के.संवसु प्रविभाग, चंद्रपूर यांनी "तो परत आलाय". अउदा प्रकल्प/स्था./दूरसंचार प्रविभाग तथा भार प्रेषण केंद्र, नागपूर "पैदागीर" तर अउदा प्रकल्प नि. संवसु परिमडंल, नागपूर व अउदा संवसु प्रविभाग, नागपूर "अचानक" ही नाटके स्पर्धे-दरम्यान सक्षमपणे सादर केली.

या स्पर्धेतील नाटकातुन प्रथम व द्वितीय क्रमांक काढण्यात आले. त्यातील अउदा संवसू प्रविभाग, चंद्रपूर व एचव्हीडीसी ग्र.के.संवसु प्रविभाग, चंद्रपूर यांचे संयुक्त विद्यमाने सादर केलेल्या "तो परत आलाय'' या नाटकाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. तर अउदा संवसू प्रविभाग,नागपूर/परिमंडल, नागपूर, यांचे संयुक्त विद्यमाने सादर केलेल्या "अचानक'' या नाटकाने द्वितीय क्रमांकांचे पारितोषिक पटकाविले आहे. श्रीमती निता खारकर यांना उत्कृष्ट स्त्री अभिनय व श्री. विशाल ढोक यांना उत्कृष्ट पुरूष अभिनया करीताचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

नाट्यस्पर्धेचे बक्षीस वितरण व समारोपाच्या कार्यक्रमात व्यासपीठावर आयोजन समितीचे अध्यक्ष व नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता, श्री. मिलींद बहादुरे तसेच प्रमुख पाहुणे श्री. दिलीप घुगल, मुख्य अभियंता, महावितरण, चंद्रपूर हे प्रामुख्याने उपस्थीत होते. तसेच आयोजन समितीचे सचिव श्री. सतिश अणे, अधीक्षक अभियंता व श्री. सुधीर ढवळे, अधीक्षक अभियंता, अउदा संवसु प्रविभाग, चंद्रपूर व नाटकांचे तीनही परिक्षक व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. असराणी, अतिरीक्त कार्यकारी अभियंता यांनी केले.

नाट्यस्पर्धेचे बक्षीस वितरण व समारोपाचा कार्यक्रम श्री. मिलींद बहादुरे, अध्यक्ष व प्रमुख पाहुणे श्री. दिलीप घुगल, मुख्य अभियंता, महावितरण, चंद्रपूर यांच्या हस्ते सर्व विजेत्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

आंतर मंडलीय नाट्यस्पर्धा यशस्वी करण्याकरीता श्री. सतिश अणे अधीक्षक अभियंता व श्री. सुधीर ढवळे, अधीक्षक अभियंता, अउदा संवसु प्रविभाग, चंद्रपूर तसेच श्री. उमेश शेंडे, अति. कार्य. अभियंता यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच अउदा संवसु प्रविभागातील सर्व कार्यकारी अभियंता, अधिकारी व कर्मचारी यांचे सुध्दा विशेष सहकार्य लाभले.

महापारेषणच्या इतरही परिमंडलांतर्गत आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. सांघिक कार्यालय व वाशी परिमंडल यांची संयुक्त, तर इतरही परिमंडलांतर्गत नाट्यस्पर्धा पार पडल्या.

## वाशाळा उपकेंद्राची उपलब्धी

पुणे येथे महाऊर्जा ने आयोजित केलेल्या वर्ष २०१२-१३,२०१३-१४ चा बक्षिस समारंभ पार पडला. महाराष्ट्रातील विविध कंपन्या, सरकारी कार्यालये यांना प्रमाणपत्र सन्मानचिह देऊन गौरवण्यात आले. मा. ऊर्जामंत्री महोदय श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते व शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांचे उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

विविध कंपन्यामध्ये महापारेषण कंपनीचे नाव उच्चारताच अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्यात. खरंतर महापारेषण कंपनीने या उपक्रमात सहभाग नोंदवला नव्हताच. एका छोटयाशा २०० के.व्ही. उपकेंद्र वाशाळा (डोंबिवली विभाग, वाशी झोन) येथील उपकेंद्र प्रमुखाने भाग घेतला होता.

**काय केले ?**

२२० के.व्ही. उपकेंद्र म्हटले तर पॉवर ट्रान्सफार्मर आलेत, ब्रेकर्स आलेत. कॉम्प्रेसर आलेत, पॅनेल आलेत व इतर उपकेंद्रात जे जे उपकरण असतील ते सर्व आलेतच. सरकारी कार्यालय म्हटलं तर साहित्याचा, विजेचा अपव्यय हे सगळीकडे प्रामुख्याने दिसून येते. गरज नसताना एअर कंडिशनर्स, पंखे, दिवे सुरु असं सर्वच दिसून येतचं येत. म.रा.वि.मं एक कंपनी (बोर्ड) असताना उपकेंद्रातील विजेच्या वापरावर बिल तयार होत नव्हते. त्यामुळे बेसुमार वीज वापरली जायची, महापारेषण कं. निर्माण झाली व महावितरण कंपनीला बिल दयायची वेळ आली, तेव्हा डोळे उघडले गेले. महिन्याला दीड दोन लाख वाशाळ उपकेंद्राचे बिल यायचे. काय करता येईल असा विचार करुन उपकेंद्र प्रमुखाने दोनही पॉवर ट्रान्सफार्मरचे कुलिंग फॅन दुरूस्त करून ते ॲटो मोडवर ठेवणे सुरू केले. तापमान ठराविक अंकावर गेले तरच पंखे सुरू होवू लागले. साहजिकच वीज वापर कमी होऊ लागला. प्रकाशासाठी टॉवर्सवर असणाऱ्या बल्बची गरज असतानाच ते बल्ब प्रकाशू लागले. डिस्टिल्ड वॉटर प्लॅंट सुर्यप्रकाशावर सुरू केलेत, असे करता अनेक नवीन उपाय सापडू लागलेत. दिवसभर ड्यूटी करणारे, उपकेंद्राना भेटी देणारे अधिकारी, अशा सर्वाना चहा वगैरे बनवायला, एल.पी.जी. गॅसचे कनेक्शन घेतले. या सर्वाचा परिणाम काय झाला. तर विजेचे माहिन्याचे बिल ३०-४० हजारावर आले. कंपनीचा फायदा होऊ लागला. शिवाय कर्मचाऱ्यात एक शिस्त लागली.

महाऊर्जाचे Energy साठी सहभाग घेणे सुरू झाले. तेथूनही नव्या कल्पना सुचु लागल्या. थर्मोव्हिजन कॅमेराने हॉट स्पॉट शोधणे व ते लगेच अटेन्ड केल्याने फायदे ही होवू लागले. आपले घर, आपले कुटुंब तसेच आपली कंपनी ही भावना कर्मचाऱ्यात वाढीस लागली.

महाऊर्जाने वाशाळा उपकेंद्रास सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र देवून गौरविले. खरंतर सर्कल, झोन पातळीवर सहभाग घ्यायला हवा... असं महाऊर्जाच्या अधिकाऱ्यांनी दरवर्षी सांगितलं असतानाही श्री. पेटकर हे दरवर्षी उपकेद्र पातळी तर कधी वैयक्तिक पातळीवर (घरासाठी) सहभाग घेत राहिले व नाविन्यपूर्ण योजना राबवल्याने त्यांच्या या सहभागामुळे उपकेंद्राच्या स्वरूपात महापारेषणचा गौरव करण्यात येतो.

**संकलन**
**श्रीकांत पेटकर**
कार्यकारी अभियंता
राज्य पारेषण उपक्रम, सांघिक कार्यालय, मुंबई

# From the Desk of Director (Projects)





प्रकल्प म्हणजे एक स्वप्न असतं आणि ते कृतीमध्ये उतरवण एक कला व विज्ञान आहे. स्वप्न कृतीमध्ये उतरविण्याकरीता एक ठरवुन घेतलेला कालखंड असतो कारण स्वप्नाला कृतीमध्ये आणण्याकरीता वेळेची मर्यादा राहते. नाहीतर त्याला काही अर्थ राहणार नाही. Concept to Commissioning असा प्रवास त्या स्वप्नांना गाठायचा असतो.

ह्या प्रवासात अनेक टप्पे पार पाडावे लागतात. संकल्पना/साहित्य पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वयन करणे व देखभाल दुरुस्तीसाठी देणे अशा अनेक बाबींची पुर्तता केल्यानंतर प्रकल्प कृतीमध्ये आकारतो.

प्रत्येक टप्प्यात वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जायचे असते. त्यातील काही बाबी/ घटक आपल्या कार्यक्षेत्रातील तर काही बाह्य बाबी की ज्यांच्यावर आपले नियंत्रण नसते अशा असतात. मात्र त्या सर्व घटकांचे व्यवस्थित व्यवस्थापन करुन प्रकल्प ठरलेल्या वेळेत पूर्ण करणे हे चांगल्या प्रकल्प व्यवस्थापकाची/ अभियंत्यांची ओळख ठरते.

वेळ, गुणवत्ता व किंमत ह्या प्रकल्पांचे तीन आधारस्तंभ ठरतात. त्यातील महत्वाचा आधारस्तंभ म्हणजे Time. आज आपण ह्यावर प्रकाशझोत टाकुया.

Time, Money and Energy ह्या तीन स्त्रोतांपैकी Time असा स्त्रोत आहे की तो एकदा गमावला तर परत मिळत नाही. दुसर, जर वेळेत झाल नाही तर ते काम नाही. "Delivery on Time" त्याकरीता म्हटल जातं.

असा स्त्रोत आहे की तो एकदा गमावला तर परत मिळत नाही. दुसर, जर वेळेत झाल नाही तर ते काम नाही. "Delivery on Time" त्याकरीता म्हटल जातं.

प्रकल्प व्यवस्थापनेमध्ये वेळेला अतिशय महत्त्वाचे मानले जाते. त्याकरीता अतिशय Minute Level ला Supply Chain, Management चे व्यवस्थापन करणे गरजेचे राहते. Alternate Plan म्हणजे जर एखादी Contingency उभी राहिली तर त्याचे व्यवस्थापन कसे करायचे हे Time व्यवस्थापनामध्ये आणणे गरजेचे असते.

प्रकल्प वेळेत पुर्ण केल्यास संपुर्ण प्रकल्प नियोजनाप्रमाणे पुर्ण होण्यास मोलाची मदत होते व त्यास विलंब झाल्यास प्रकल्प बारगळतो, त्याचा विपरीत परिणाम प्रकल्पावर होत असतो.

Time over run झाल्यास Cost Over run होणे स्वाभाविक ठरते. Financial Results त्यामुळे बिघडतात व एकुणच प्रकल्पाची पत खाली येते. त्यामुळे प्रकल्प पूर्ण झाला तरी त्याचे समाधान लाभत नाही.

त्याकरीता प्रत्येक टप्प्यावर वेळेचे सुयोग्य नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याकरीता आता अत्याधुनिक Computer Applications बाजारात उपलब्ध आहेत. त्याच्या सहाय्याने आपणाला Time Management उच्च पातळीवर नेण्यास मदत होते. महापारेषण कंपनीतील या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण होतील अशी आशा बाळगू या.

**नववर्षाच्या शुभेच्छां सह** !

**From the Desk of Director (Projects)**

# दुसाने भगिनींचे यश



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ कार्यालय, औरंगाबाद येथे कार्यरत सौ.मंजुषा दुसाने वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) यांच्या कन्या कु.अदिती व कु.अन्विता यांचे यश: -

कु.अदिती विजय दुसाने हिने CBSC बोर्डाच्या १० वीच्या परीक्षेत १० CGPA (९६%) मार्क मिळविले तसेच National Natural Capital Olymipiad या परिक्षेत तीने संपूर्ण भारतात दुसरा नंबर पटकविला या बद्दल तिला रु १५,०००/- रोख, प्रशास्तीपत्रक व ट्रॉफी देण्यात आली.



कु.अन्विता विजय दुसाने हिने वयाच्या १० व्या वर्षी MS-CIT ही परिक्षा ९१% मार्कानि ऊत्तीर्ण केली.


दोघींच्या ह्या यशाबद्दल औरंगाबाद परिमंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले व कु.अदिती व कु.अन्विता यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महापारेषण परीवारा तर्फे कु.अदिती व अन्विता यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

# From the Desk of ED (HR)

## जीवनगाणे गातच राहावे

जगी सर्व सुखी असा कोण आहे, विचारी मना तोची शोधुनी पाहे. “Best of All” फार कमी लोकांच्या नशीबास लाभते. अनेकांना काही जास्त काही कमी अशा परिस्थितीतुन जावे लागते.

परिस्थीतीशी जुळवुण घेणे एवढेच आपल्या हातात असते. तसे आपण केले नाही तर आपल्याला सतत निराशेच्या छायेत जगावे लागते. त्याकरिता माझ्याकडे काय नाही त्यापेक्षा माझ्याकडे काय आहे त्याबद्दल समाधान व्यक्त करुन त्याचा जास्तीत जास्त आनंद मिळवता आला पाहिजे.




Values are more Important than Valuables त्याकरिता Valuable मिळाले नाही तरी चालेल परंतु Values ची तडजोड होता कामा नये.

त्याकरिता चांगले विचार व आचार जोपासता आले पाहिजे. चांगल्या लोकांच्या संगतीमध्ये चांगले आचरण पाळण्यास मदत मिळते.

Values जोपासणे म्हणजे संत, साधु व महात्म्य होणे असे नाही तर कटीबध्द होणे की आपल्या हातून नकळत सुध्दा कोणती चुक होणार नाही, कोणी दुखावणार नाही, कोणाचा हक्क मारणार नाही. शुध्द आचरण ठेवणे सहज शक्य आहे त्याकरिता कोणत्याही लहान-मोठया आमिषास बळी पडु नये. जरी रस्ता काट्याकुट्यांचा असेल, परिश्रमाचा असेल व खाचखळग्यांचा असेल, मात्र कोणताही चुकीचा मार्ग अवलंबणार नाही.

There is no shortcut to Hardwork परिश्रमाशिवाय सिध्दी प्राप्त नाही. त्याचबरोबर विफलतेला घाबरुन जावु नका. विफलतेमध्ये सफलतेचे स्त्रोत राहते. त्याचा आपल्याला शोध घेता आला पाहिजे. जगातले सर्व यशस्वी व्यक्तीचे अनेक असफलतेला सामोरे गेलेले आपण पाहिले आहे.

Competition करण्यापेक्षा Contribution वर Focus केले असता समाधान लाभते. Competition मुळे व्यक्ती सफल होऊ शकतोही मात्र Contribution देणारा व्यक्ती सापडलाता/ असफलतेच्या पुढे जावून

आत्मसमाधानाच्या उंबरठ्यावर जावून बसतो व ते समाधान मोलाचे ठरते.

Your Success is Your Responsibility किंवा तुच आहे तुझ्या जिवनाचा शिल्पकार

वाईट परिस्थिती मानव निर्मित State of Affair आहे. आपल्या हातात आहे की आपण परिस्थीती कशी तयार करायची.

चांगला निश्चय जर आपल्याकडे असेल तर आपल्याला मदत करणारे अनेकजण आपल्याला लाभतात. त्यांच्या मदतीमुळे, सहकार्यामुळे आपल्या प्रयत्नाला यश मिळते. ती कायनात अश्या चांगल्या व्यक्ती आपल्याला भेटवतात व आपण प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यास मदतनीस ठरतात.

मरावे परी किर्ती रुपे उरावे. आपल्या मरणानंतर एक चांगली व्यक्ती म्हणून आपली ओळख राहण्याकरीता आपण लोकांच्या स्मरणी राहू असे जगणे महत्वाचे आहे.

**नववर्षाच्या शुभेच्छा सह !**

**From the Desk of ED, HR**


संपादक : श्री.संदीप नरडेले, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd., Printed at Hema Arts : 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221 & Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.


The Company accepts no responsibility for the matter published in the journal.